पशुपालन

# यशस्वी पशुपालनाची पंचसूत्री




**डॉ. स्मिता कोल्हे**
(मो.नं. ९९७०४२५३८९)
**डॉ. राहुल कोल्हे**
के.एन.पी. कॉलेज ऑफ व्हेटरनरी सायन्स,
शिरवळ, जि. सातारा




कुठल्याही व्यवसायात व्यवस्थापनाला अत्यंत महत्त्व आहे. उत्तम व्यवस्थापक हा नक्कीच यशस्वी होतो. पशुपालन व्यवसायाची आवड असावी. उत्तम वंशावळीच्या जनावरांची निवड करावी. आपली साधनसंपत्ती, क्षमता जमेस धरून या व्यवसायाची सुरुवात करावी. सद्य:स्थितीत पशुपालन व्यवसाय हा स्वयंपूर्ण व्यवसाय झाला आहे. पशुपालकाने व्यावसायिक बाबींबरोबरच या क्षेत्रातील पारंपरिक ज्ञानाला शास्त्रीय दृष्टिकोनाची जोड देणे गरजेचे आहे.

कृषिप्रधान संस्कृती असलेल्या आपल्या देशात पशुपालन व्यवसाय शेतीपूरक व्यवसाय म्हणून गणला जातो. परंतु सध्या या व्यवसायाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे. आपण जर पशुपालनाकडे व्यवसाय-उद्योग म्हणून बघत असू, तर तो स्वीकारताना त्यात व्यावसायिकता ही आलीच पाहिजे तरच आपल्याला फायदा होईल. पशुपालनातील दोष समजून घेणे, उपलब्ध तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, प्रतिबंधात्मक उपाय, चिकित्सक दृष्टिकोनातून शास्त्र स्वीकारणे आणि योग्य बाजारपेठ या पंचसूत्रीचा वापर आपण यशस्वी पशुपालनासाठी निश्चितच करू शकतो.

पशुपालन करायचे तर दोन-चार गाई, म्हशी अथवा शेळ्या आणल्या म्हणजे व्यवसाय होत नाही. जनावरे सांभाळायची म्हणून सांभाळू नका. तुमच्या कष्टाला माहितीची, तंत्रज्ञानाची, आधुनिकीकरणाची जोड द्या. वडिलोपार्जित ज्ञानाला शास्त्रीय ज्ञानाची जोड द्या. आज आपण दुग्ध उत्पादनात अग्रेसर आहोत. जरी आपण दूध उत्पादनात प्रथम क्रमांकावर असलो तरी स्वच्छ दुधाची प्रत याबाबतीत मात्र फार मागे आहोत आणि याच कारणाने निर्यात क्षेत्रातही मागे आहोत. आपल्या देशाला नैसर्गिक साधनसामग्रीचे वरदान आहे. तरी या नैसर्गिक देणगीला आधुनिक, नवनवीन तंत्रज्ञानाची जोड देऊन यश कसे गाठता येईल, याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे.

## नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे

आज सर्वांचे राहणीमान सुधारत आहे. शहराप्रमाणेच खेड्यापाड्यांत देखील राहणीमान उंचावत आहे. घरोघरी मोबाईल, टीव्ही, कॉम्प्युटर दिसताहेत. या इंटरनेटच्या युगात आपण या आधुनिक साधनसामग्रीचा वापर मनोरंजनासोबतच आपले पशुपालनाचे ज्ञान वृद्धिंगत करण्यासाठी करायलाच हवा. आपण पशुपालन करताना कुठलीच नोंदवही ठेवत नाही. महिन्याचाच नाही तर वर्षभराचा खर्च, आर्थिक हिशोब आपल्याला पूर्णपणे माहीत





नसतो. आपल्या गोठ्यातील जनावरांचा कळप चार जनावरांचा असो अथवा पन्नास- चांगले उत्पादन, आर्थिक नफा हाच पशुपालनाचा मुख्य हेतू असतो. खर्च, वंशावळ, पशु-आहार व व्यवस्थापनाच्या नोंदी ठेवणे आवश्यक असते. जनावरांची पैदास क्षमता तसेच उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी त्यांची वंशावळ माहिती असणे गरजेचे असते. यातून आहार व्यवस्थापन, प्रजनन, आरोग्य अशा व्यवस्थापकीय बाबींचे नियोजन करणे सुलभ होते. जनावरांची सद्यस्थिती, जन्मदर, मरतुकीचे प्रमाण कळते, वजनवाढ, खाद्यपुरवठा, पशुधन, खरेदी-विक्री, नफा-तोटा आदींची माहिती नोंदवहीवरून सहज घेता येते. यासाठी नोंदवह्या ठेवाव्याच. भाकड गाई गोठ्यात आहेत म्हणून नुसत्या सांभाळू नका, त्यांचा आर्थिकदृष्टीने विचार करा.

## योग्य जातींची निवड; आहार संतुलन आवश्यक

पशुपालन व्यवसाय सुरू करताना जनावरांच्या जातीची निवड योग्य विचार करूनच करावी. संतुलित आहार व्यवस्थापन करावे. जास्त प्रमाणात पशुखाद्य अथवा पेंड दिल्याने भरपूर चांगल्या गुणप्रतीचे दुग्धोत्पादन मिळते, ही पशुपालकांची धारणा बरोबर नाही. जनावरांना देखील सर्व अन्नघटकांची ठराविक प्रमाणात आवश्यकता असते. आपल्याकडे जर ओलिताची सोय असेल तर बारमाही हिरवा चारा मिळण्याच्या दृष्टीने नियोजन करा. वैरणीच्या पिकांची लागवड करा, जेणेकरून पशुखाद्यावरचा खर्च कमी होईल. नवजात वासरांची काळजी हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. जन्मल्याबरोबरच पहिल्या काही तासांतच वासराला मातेचा चीक मिळणे आवश्यक असते. वासराच्या वजनाच्या १/१० चीक पाजायलाच हवा. वासरांना दूध पाजताना सुरवातीचे दूध पाजावे. मधल्या आणि शेवटच्या धारेत स्निग्धांशाचे प्रमाण जास्त असते. चिकात भरपूर सत्त्वांश असतो. जन्मत: वासराच्या वजनाची नोंद घ्यावी. वासरांपुढे खनिजयुक्त चाटणविटा ठेवाव्यात. वासरू बांधायची जागा कोरडी, स्वच्छ ठेवावी. वासरांना कृमिनाशक औषधे दर

तीन महिन्यांनी द्यावी. त्यांचे योग्य लसीकरणही करावे. पशुपालनामध्ये लसीकरण खूप महत्त्वाचे आहे. संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण होण्यासाठी उपलब्ध रोगप्रतिकारक लसी जनावरांना पशुवैद्यकाच्या सल्ल्याने नियमितपणे टोचून घ्याव्यात. त्यामुळे जनावरांची रोगप्रतिकार क्षमता वाढून रोगांपासून मृत्यूचा धोका टाळता येईल. रोग आल्यावर उपचार करण्यापेक्षा रोग येऊ नये म्हणून लसीकरण आवर्जून करावे. याचबरोबर जनावरांचे जंतनिर्मूलनही वेळोवेळी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने करून घ्यावे. जनावरांमध्ये जंतांची वाढ मोठ्या प्रमाणात होते. हे जंत जनावरांचे अन्न, सत्त्व, रक्त शोषण करतात. त्यामुळे जनावरांचे फार नुकसान होते. त्यांची वाढ कमी होते, भूक मंदावते, जनावरे माजावर येत नाहीत, दूध उत्पादनात घट होते, प्रतिकारशक्ती कमी होते, यामुळे जनावरे सारखी आजारी पडतात. आपले आर्थिक नुकसान होते. जनावरांना योग्य आहारासोबतच सर्व शरीरक्रियांसह प्रजनन, उत्पादन क्रियेसाठी जीवनसत्त्वे, क्षारमिश्रण देणे गरजेचे असते.



### कासेची निगा राखावी

दूध देणाऱ्या गाई-म्हशींमध्ये कासेची निगा राखणे फार महत्त्वाचे आहे. योग्य व्यवस्थापन केले, निगा राखली तर



स्तनदाह हा आजार होत नाही. जनावरांना स्वच्छ पाणीपुरवठा करणे आवश्यक असते. जनावरांना तीन ते चार वेळा पाणी प्यायला द्यावे. जनावरांच्या गोठ्याचे व्यवस्थापन हे अतिशय महत्त्वाचे आहे. गोठे हवेशीर परंतु ऊन, वारा, पाऊस, थंडी यापासून संरक्षण देणारे असावेत. गोठ्यात जनावरांची गर्दी होऊ देऊ नये. गोठ्याच्या जमिनीवर टोकदार दगड, काडी-कचरा तसेच घाण साचेल असे खड्डे नसावेत. गुरांचा गोठा दिवसातून कमीत कमी तीन वेळा साफ करावा. गोठा उभारताना गोठ्याची लांब बाजू पूर्व-पश्चिम आणि रुंद बाजू उत्तर-दक्षिण दिशेला असावी. यापैकी उघडी बाजू दक्षिणेला ठेवल्यास ऊन, वारा, पाऊस आणि हिवाळ्यात उत्तरेकडून येणाऱ्या थंडीच्या लाटेपासून संरक्षण मिळण्यास मदत होते. गोठ्यासाठी मुक्तसंचार पद्धतीचा अवलंब करावा.

### शास्त्रीय माहिती प्राप्त करावी

कुठल्याही व्यवसायात व्यवस्थापनाला अत्यंत महत्त्व आहे. उत्तम व्यवस्थापक हा नक्कीच यशस्वी होतो. पशुपालन व्यवसायाची आवड असावी. उत्तम वंशावळीच्या जनावरांची निवड करावी. आपली साधनसंपत्ती, क्षमता जमेस धरून या व्यवसायाची सुरुवात करावी. सद्य:स्थितीत पशुपालन व्यवसाय हा स्वयंपूर्ण व्यवसाय झाला आहे. पशुपालकाने व्यावसायिक बाबींबरोबरच या क्षेत्रातील पारंपरिक ज्ञानाला शास्त्रीय दृष्टिकोनाची जोड देणे गरजेचे आहे. या क्षेत्रातील ज्ञान वाढविणे, संशोधनाचे निष्कर्ष समजावून घेणे, तज्ज्ञांशी चर्चा करणे, वाचन- मनन- चिंतन प्रयोग करणे याची गरज आहे. वृत्तपत्रातील माहिती, मासिके, आकाशवाणी, दूरदर्शन यांची नियमित सदरे यांची नोंद घ्यावी. पशुमेळावे, दूधस्पर्धा, प्रशिक्षणे यांचा उपयोग करून घ्यावा. जनावरांचे आरोग्य, प्रजनन, आहार व्यवस्थापन यासाठी पारंपरिक ज्ञानाला शास्त्रीय दृष्टिकोनाची, ज्ञानाची जोड देऊन यशस्वी पशुपालक व्हा! ■